**शेततळ्यासह विविध बाबींसाठी लागणारी दर्जेदार ताडपत्री, मुरघास बॅग, खतासाठी बॅग आणि अन्य प्लॅस्टिक कागद खरेदीसाठी शेतकरी भाळवणी (ता. पारनेर, जि. नगर) येथील जी. के. प्लॅस्टिक कंपनीला प्राधान्य देतात. विजया नंदकुमार गारुडकर यांनी कंपनीचा चांगला विस्तार केला आहे.**

# ‘जी. के. प्लॅस्टिक’च्या दर्जेदार उत्पादनाला पसंती

सूर्यकांत नेटके

एकेकाळी दुसऱ्यांच्या कंपनीत नोकरी करत असलेल्या नंदकुमार गारुडकर यांनी अथक प्रयत्नांतून जी. के. प्लॅस्टिक कंपनीची सुरुवात केली. बारा कामगारांपासून सुरू झालेल्या या कंपनीमध्ये आता १५० जणांना रोजगार मिळाला. नंदकुमार गारुडकर यांच्या निधनानंतर खचून न जाता पाच वर्षांपासून विजया नंदकुमार गारुडकर यांनी हिमतीने कंपनीचा डोलारा चांगल्या पद्धतीने सांभाळला आहे.

नगरहून कल्याणकडे जाताना भाळवणीच्या अलीकडे चार किलोमीटरवर जी. के. प्लॅस्टिक कंपनी आहे. साधारण सहा एकरांवर विस्तारलेल्या या कंपनीत कामगारांना सातत्याने मार्गदर्शन करताना विजयाताई दिसतात. खरं तर जी. के. प्लॅस्टिक ही कंपनी सुरू होण्यामागे आणि विस्तारण्यामागे मोठा रंजक इतिहास आणि खडतर प्रवासाची जिद्द आहे. नंदकुमार गारुडकर आणि विजया गारुडकर हे दांपत्य घोगरगाव (ता. श्रीगोंदा) येथील. रोजगारासाठी १९८२ मध्ये नगरला स्थायिक झाले. नंदकुमार हे नगरमधील एमआयडीसीत खासगी कंपनीत नोकरीला होते. विजयाताई आरोग्य विभागात पर्यवेक्षक होत्या. नंदकुमार यांनी साधारण १० वर्षे नोकरी केली. त्यांच्या मनात व्यवसाय घोळत होता, म्हणून नगर शहरातील सावेडी भागात त्यांनी एक गाळा भाडेतत्त्वावर घेतला. शिलाई यंत्र घेऊन कापड खरेदी करत ताडपत्री, गोण्या, बाजारात लागणाऱ्या हातपिशव्या तयार करून त्यांनी विक्रीस सुरुवात केली. नगर शहरासह परिसरातील गावात दुचाकीवर जाऊन ते पिशव्या विकू लागले. साधारण दहा वर्षे त्यांनी हे काम केले.

कामातील दर्जेदारपणामुळे मागणी वाढू लागली. त्यामुळे त्यांनी स्वतः ताडपत्रीनिर्मिती व्यवसाय करण्याचा निर्णय घेतला. विजयाताई नोकरी करत होत्या, मात्र व्यवसायात पतीला साथ देत उद्योग विस्तारासाठी जागेचा शोध सुरू केला. अल्प भांडवल उभे करून १९९९ मध्ये भाळवणी येथे वीस गुंठे जागा घेऊन त्या ठिकाणी ताडपत्री, शेततळ्याचा कागदनिर्मितीसाठी यंत्रणा खरेदी केली. आज तीन एकरांवर विस्तारलेल्या या कंपनीने राज्यभरात नावलौकिक आणि शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला आहे. व्यवसायाने प्रगतीची दिशा पकडल्यानंतर विजयाताईंनी २० वर्षे नोकरी करून २०११ मध्ये पर्यवेक्षक पदाचा राजीनामा दिला. २०१६ मध्ये नंदकुमार यांचे अकाली निधन झाले. मात्र विजयाताईंनी हार न मानता व्यवसाय पुढे जिद्दीने सुरू ठेवला.

## शेततळ्याचा प्रयोग

राज्यात साधारण २००० ते २००२ या काळात शेततळ्याची चर्चा सुरू झाली होती. अगदी नवीन असलेली संकल्पना सत्यात उतरवण्यासाठी आणि जी. के. प्लॅस्टिकचा शेततळ्यासाठीच्या कागदाचा दर्जेदारपणा सिद्ध करण्यासाठी नंदकुमार आणि विजयाताई यांच्या पुढाकारातून मिरजगाव (ता. कर्जत) येथे जगन्नाथ म्हैत्रे यांच्या शेतात शेततळे करण्यात आले. त्यातील कागद आठ वर्षांपेक्षा अधिक काळ टिकला.

म्हैत्रे यांनी केळी, द्राक्षासह विविध पिके या शेततळ्यावर घेतली. हे शेततळे पाहायला शेतकरी येत. त्याबाबतचे ‘सकाळ’ दैनिकामध्ये वृत्त प्रकाशित झाल्यानंतर २००४ मध्ये धेरडा (ता. गंगापूर) येथील भाऊसाहेब औताडे यांनी दोन एकर आकाराचे शेततळे केले. जी. के. प्लॅस्टिकने त्या शेततळ्याला कागद पुरवठा केला. त्या वेळी ते राज्यातील सर्वांत मोठे शेततळे होते. राज्यातून शेतकरी सहली शेततळे पाहायला येत. येथून पुढे खऱ्या अर्थाने शेततळ्याची संकल्पना वाढत गेली आणि जी. के. प्लॅस्टिकच्या दर्जेदार शेततळ्याचा कागदाला राज्यात मागणी वाढली. आतापर्यंत लाखो शेततळ्यासाठी कंपनीने कागद पुरवठा केला आहे.



जी.के. प्लॅस्टिक कंपनीचा व्यवसाय खंबीरपणे सांभाळणाऱ्या विजयाताई गारुडकर.

### उत्पादनाची वैशिष्ट्ये

- सर्व शासकीय योजनेच्या अनुदानास पात्र.
- शेततळ्यासाठी लागणारे रेनफोर्सड एचडीपीई जीओमेम्ब्रेन ३०० मायक्रॉन/ ५०० मायक्रॉन/७५० मायक्रॉनमध्ये उपलब्ध.
- पाच वर्षे वॉरंटीसह, आयएसआय मार्क.
- आय एस १५३५१ :२०१५ प्रमाणित उत्पादन.
- सूर्यप्रकाश अतिनील किरणांपासून संरक्षित
- शेततळ्याच्या आकारमानानुसार प्रत्यक्ष शेततळ्यावर जोडणी.
- सर्व आकारांमध्ये तत्काळ उपलब्ध.
- ट्विनी वेज वेल्डरद्वारे जोडणीवर अस्तरीकरण.
- शंभर टक्के वॉटरप्रूफ व गळती प्रतिबंधक.
- सर्वांत मोठे शेततळे बनविणारी एकमेव कंपनी.
- शेतकरी आणि इतरांसाठी कंपनीत कागद खरेदी करण्याची सोय. दरही कमी.



शेततळे, ताडपत्रीसाठी गुणवत्तापूर्ण प्लॅस्टिक कागद निर्मिती.

## सर्वांत मोठ्या शेततळ्याचे चॅलेंज

२०१६ मध्ये पती नंदकुमार यांच्या अकाली निधनानंतर जी. के. प्लॅस्टिक कंपनीची जबाबदारी विजयाताईंकडे आली. त्याच वर्षी कंपनीला शिर्डीमध्ये साई संस्थानच्या ३२ एकरांवरील शेततळ्याचे काम मिळाले. नंदकुमार साथीला नसले तरी विजयाताईंनी हे मोठे आव्हान स्वीकारले आणि मुदतीच्या आत तलाव पूर्ण करून दिला. त्यामुळे जी. के. प्लॅस्टिकची विश्वासार्हता वाढली. पुढच्या वर्षी (२०१७-१८) शिर्डी नगरपंचायतीच्या ३९ एकरांवरील तलावाचे काम मिळाले. देशातील हा सर्वांत मोठा तलाव होता. हे कामही त्यांनी वेळेत पूर्ण केले.

जी. के. प्लॅस्टिक कंपनी सुरू झाली त्या वेळी दर दिवसाला एक टन कागदाचे उत्पादन घेतले जात होते, ते आता १० टनांवर पोहोचले आहे. कंपनीत पूर्वी सर्वसाधारण यंत्रणा होत्या, दोन वर्षांपूर्वीपासून अत्याधुनिक हायस्पीड यंत्रणा कार्यरत आहेत. त्यामुळे उत्पादन क्षमता आणि दर्जेदारपणा वाढला. महाराष्ट्रासह राजस्थान, मध्य प्रदेश राज्यात जी. के. प्लॅस्टिकच्या उत्पादनाला मागणी आहे. कंपनीचे ४५ वितरक आहेत. याशिवाय भाळवणी येथील कंपनीमध्ये शेतकऱ्यांसाठी कमी दरात थेट विक्रीची व्यवस्था केली आहे.

## महानगर बँकेने दिला आधार

विजयाताई गारुडकर सांगतात, की कंपनी सुरू केल्यानंतर भांडवलाची गरज होती. त्यासाठी अनेक बँकांकडे कर्ज मागितले. मात्र बँकांनी कर्ज द्यायला नकार दिला. शेवटी पारनेर तालुक्याचे भूमिपुत्र आणि शेतकऱ्यांप्रती कायम आदर ठेवणारे सॉलिसिटर गुलाबराव शेळके यांच्या मदतीने महानगर बँकेकडून कर्ज मागितले. बँकेने विश्वासाने १९९१ मध्ये कर्ज दिले. आम्ही प्रामाणिकपणे व्यवसाय करत दिलेले कर्ज फेडले. महानगर बँकेने आधार दिल्याने आमचा कंपनीला भरभराट आली. आता कोणतीही बँक कर्ज द्यायला तयार असली, तरी व्यवसाय वृद्धीसाठी लागणारे भांडवल उभे करण्यासाठी सुरुवातीपासून आतापर्यंत आम्ही महानगर बँकेकडूनच कर्ज घेत आहोत.



शिर्डी नगरपंचायतीच्या शेततळ्याला जी. के. प्लॅस्टीकने कागद पुरविला आहे.

### कंपनीची उत्पादने

- शेततळ्यासाठी लागणाऱ्या १५० ते ५०० मायक्रॉन कागदाची निर्मिती.
- शेतीसह विविध कामांसाठी लागणारी ताडपत्री.
- पोल्ट्री शेड पडद्यासाठी लागणारा कागद.
- मुरघास साठवून ठेवण्यासाठी लागणाऱ्या दर्जेदार बॅगांची निर्मिती.
- खतासाठी लागणाऱ्या बॅगांची निर्मिती.



कंपनीमधील अत्याधुनिक यंत्रणा.

: ९३७०१३१३३१, ९२२५६०२०११, ७७७६०६५०६५